केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांमधील Regional Institute of Ophthalmology (RIO) सर जे.जे.रुग्णालय, मुंबई करीता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी सर्वसाधारण घटकांतर्गत प्रलंबित केंद्र हिश्श्याची रक्कम रु. २००.०० लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-०४१९/प्र.क्र.२७८/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०९ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O.No.Z.२२०१५/२/२०१४-NHM-Finance, दिनांक १० डिसेंबर, २०१४.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. T.१२०१२/३८/२०१६-NCD/BC, दिनांक १६ जानेवारी, २०१८.
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/अंनिका/अनुदान मागणी/१११२-१११६/२०१९-२०, दिनांक ०८ एप्रिल, २०१९.

प्रस्तावना :-

ग्रामिण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल, २००५ पासून राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान सुरू केले आहे. सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता कार्यक्रम राबविणे इत्यादी आरोग्य सेवा देण्यात येतात. त्या अनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांमधील Regional Institute of Ophthalmology (RIO) सर जे.जे.रुग्णालय, मुंबई करीता सर्वसाधारण वर्गवारीसाठी (General) केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांमधील Regional Institute of Ophthalmology (RIO) सर जे.जे.रुग्णालय, मुंबई करीता सर्वसाधारण वर्गवारीसाठी (General) केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदान सन २०१९-२०

या आर्थिक वर्षात रु.९२५५८.७९ लक्ष एवढी तरतुद अर्थसंकल्पित केलेली आहे. सदर कार्यक्रमाकरीता रु.२००.०० लक्ष इतके अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करणे आवश्यक आहे.

२. सदरहू योजने अंतर्गत राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांमधील Regional Institute of Ophthalmology (RIO) सर जे.जे.रुग्णालय, मुंबई करीता सर्वसाधारण वर्गवारीसाठी (General) केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदान रु.२००.०० लक्ष (रुपये दोनशे लक्ष फक्त) इतकी रक्कम राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. सदरचा खर्च लेखाशिर्ष २२१०F१५७ (०१) (१८) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र पुरस्कृत योजना- केंद्राचा हिस्सा ६० टक्के (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर)) या लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावा.

४. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटींची व शर्तीची पुर्तता होत असल्याचे सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांनी प्रस्तावामध्ये सादर केल्याप्रमाणे प्रमाणित केले आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

६. या संदर्भात वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार निधी खर्च झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर करावी.

७. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६२/अर्थोपाय, दिनांक ०७/०२/२०१९, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७०/व्यय-१३, दिनांक १२/०२/२०१९ व नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८४/१४७२, दिनांक १४ मे, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201908061210074517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.08.09 14:41:30 +05'30'

(ज. स. तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१२.निवडनस्ती (आरोग्य-७).